आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ संचालित,

बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव ता. आंबेगाव जि. पुणे

**मराठी विभाग वार्षिक अहवाल**

२०२० – २०२१

**१. प्रवेश संख्या :**

| एस.वाय.बी.ए. | | | टी.वाय.बी.ए. | | | एम.ए. भाग – १ | | | एम.ए. भाग – २ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मुले | मुली | एकुण | मुले | मुली | एकुण | मुले | मुली | एकुण | मुले | मुली | एकुण |
| ०९ | १३ | २२ | ०७ | ०६ | १३ | ०८ | ०५ | १३ | ०२ | ०२ | ०४ |
| एकुण विद्यार्थी ५२ | | | | | | | | | | | |

**२.वर्तमानपत्रातील कात्रणे :**

मराठी विभागातील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रातील नामवंत व दर्जेदार दैनिकातील वाङमयीन, सांस्कृतिक, समीक्षा विषयक, भाषाविषयक कात्रणे संग्रहीत केली आहे. या कात्रणांचे वाचनही विभागातील विद्यार्थ्यांनी केले आहे. या वाचनामुळे विद्यार्थ्यांची वाङमयीन, सांस्कृतिक, समीक्षा विषयक, भाषाविषयक समज वाढण्यास मदत झाली आहे.

**३.व्याख्यान कार्यक्रम :**

| अ.क्र. | वक्ते | विषय | दिनांक | उपस्थित संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ.दिलीप कसबे, प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख,कला व वाणिज्य महाविद्यालय,चाकण ता.खेड जि.पुणे | लोकसाहित्याचे विविध कलाविष्कार | २१/०२/२०२१ | २० |
| २ | डॉ.अतुल चौरे, मराठी विभाग,डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, औंध,पुणे | मराठी साहित्याचा इतिहास | २२/०२/२०२१ | १५ |
| ३ | डॉ.नंदकुमार उदार, मराठी विभाग, पारनेर महाविद्यालय, पारनेर, जि.अहमदनगर | मराठीतील प्रकाशन संस्था सद्यस्थिती व स्वरूप | २५/०२/२०२१ | १५ |
| ४ | प्रा. घायतडके सचिन | मानवी हक्क | १६/०३/२०२१ | १० |

**४.वाचन प्रेरणा दिन :**

महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीच्या निमित्ताने दि. १५/१०/२०२० रोजी झूमवर ऑनलाईन विद्यार्थी व शिक्षकांचे कविसंमेलन संपन्न झाले.यात प्राचार्य डॉ. आय. बी. जाधव, डॉ.पुरुषोत्तम काळे, प्रा.पोपट माने, डॉ.प्रभाकर मोकळ, श्री. विनोद काळे, श्री.समीर गारे, ओंकार दरेकर, कु.सायली घुले इ.नी आपल्या कविता वाचून कविसंमेलनाची रंगत वाढवली.

**५.मराठी विभागाचे ग्रंथालय**

मराठी विभागाच्या ग्रंथ दालनात विविध विषयावरील मौल्यवान असे २७२ ग्रंथ व संदर्भ ग्रंथ आहेत. यात मराठीतील दर्जेदार अशी १२७ नियतकालिके आहेत. या सर्वांची अंदाजे किंमत **२४३०९/–** रूपये इतकी आहे. विभागातील विद्यार्थी व शिक्षक या ग्रंथालयाचा वापर आपल्या दैनंदिन अध्ययन व अध्यापनासाठी करतात.

**६.मराठी भाषा पंधरवडा**

महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा पंधरवडा साजरा करण्यात आला. या निमित्ताने महाविद्यालयात गुरूवार दि. १४/०१/२०२१ रोजी झूमवर ऑनलाईन काव्यवाचन व गझल कार्यक्रम संपन्न झाला. यात श्री.समाधान गायकवाड (सोलापूर), प्रा.जयसिंग गाडेकर (आळे), प्राचार्य डॉ. आय. बी. जाधव, डॉ. पुरुषोत्तम काळे, प्रा.पोपट माने, डॉ.प्रभाकर मोकळ, प्रा.सचिन घायतडके, श्री.विनोद काळे, श्री.समीर गारे, कु. सायली घुले, ऋतुजा येवले इ.नी आपल्या कविता वाचून कविसंमेलनाची रंगत वाढवली.

**७.विद्यापीठ स्तरीय मराठी वेबिनार**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाने जुन २०२० पासून नव्याने पुनर्रचित केलेल्या द्वितीय वर्ष कला मराठी विषयाच्या अभ्यासक्रमावर आधारित विद्यार्थी व शिक्षकांना उपयुक्त ठरेल असे एक दिवसीय विद्यापीठ स्तरीय मराठी वेबिनारचे दि.३०/०१/२०२१ रोजी आयोजन केले होते.या वेबिनारमध्ये खालील अभ्यासकांनी अभ्यासपूर्ण मांडणी केली होती.

| अ.क्र. | वक्त्याचे नाव | विषय |
|---|---|---|
| १ | डॉ.भास्कर ढोके,नाशिक | रारंग ढांग : एक आकलन |
| २ | डॉ.हरेश शेळके,पारनेर | आधुनिक भारतीय भाषा |
| ३ | डॉ.अतुल चौरे,पुणे | प्रकाशवाटा : एक आकलन |
| ४. | डॉ.राहुल पाटील,नाशिक | साहित्य विचार |

या वेबनिरमध्ये महाराष्ट्रातील १९४ विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले होते.

**८.मराठी भाषा गौरवदिन :**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि विद्यार्थी विकास मंडळ व महाराष्ट्र सरकारच्या आदेशान्वये महाविद्यालयातील मराठी विभागाने **दि. २७/०२/२०२१** रोजी ज्ञानपीठ विजेते लेखक, कवी कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरवदिन म्हणून साजरा करण्यात आला. या निमित्ताने मराठी विभागाने गोवा विद्यापीठाच्या मराठी विभागातील सहाय्यक प्रा.चिन्मय घैसास यांचे झूमवर 'मराठी भाषेतील नोकरी आणि व्यवसायाच्या संधी'या विषयावर ऑनलाईन व्याख्यान आयोजित केले होते. याप्रसंगी विभागातील ३० विद्यार्थी उपस्थित होते.

वरील प्रमाणे विभागाचे कामकाज करत असताना संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य डॉ. आय. बी. जाधव, सहकारी प्रा. डॉ. पुरुषोत्तम काळे, प्रा. पोपटराव माने आणि सहकारी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, सेवक, विद्यार्थी या सर्वांचे अत्यंत मोलाचे योगदान लाभले आहे.

-----------

मराठी विभाग प्रमुख
बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव
ता आंबेगाव जि.पुणे.

बी. डी. काळे महाविद्यालय कोड नं. १९६ घोडेगाव

प्राचार्य
बी. डी. काळे महाविद्यालय
घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे